आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१५ जून २०२४ - शनिवार

प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी  इटलीचा दौरा आटोपून आज नवी दिल्लीला परतले. हा दौरा अतिशय फलदायी झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या१८ जूनला वाराणसी इथं एका कार्यक्रमात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेअंतर्गंत नऊ कोटी तीन लाख  शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे २० हजार कोटी रुपये जमा करणार असल्याची माहिती केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज दिली. नवी दिल्लीत बातमीदारांशी ते बोलत होते. प्रधानमंत्री मोदींच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवल्याचंही चौहान यांनी सांगितलं.

<><><><>

उच्चशिक्षण संस्थांमधला प्रवेश विद्यार्थ्यांनी तीस सप्टेंबरपर्यंत रद्द केल्यास किंवा अन्यत्र प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्काचा परतावा देणं संबंधित संस्थेला बंधनकारक राहणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग - यूजीसीनं २०२४-२५ या वर्षासाठी शुल्क परतावा धोरण जाहीर केलं. केंद्र किंवा राज्य सरकारांच्या अखत्यारीतल्या उच्चशिक्षणसंस्था, आयोगानं मान्यता दिलेल्या संस्था, अभिमत विद्यापीठं या सगळ्यांना हे धोरण लागू होणार आहे.

<><><><>

पंढरपूरच्या आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या दिंड्याना वीस हजार रुपयांचं अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे.  पालखी सोहळ्याच्या नियोजनासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल मुंबईत झालेल्या  बैठकीत ते बोलत होते.  वारकऱ्यांसाठी गटविमा, जादा एसटी गाड्या, पथकरमाफी, इत्यादी सुविधा देण्यात आल्या आहेत.

आषाढी एकादशीला श्री विठ्ठलासोबतच रुक्मिणीमातेची देखील शासकीय पूजा होणार आहे. आषाढी यात्रेत सहभागी होण्यासाठी रुक्मिणीमातेचं माहेर म्हणून ख्याती असलेल्या अमरावती मधल्या कौंडिण्यपूर इथून पालखीनं काल प्रस्थान केलं. ४३० वर्षांची परंपरा असलेल्या या पालखी सोहळ्याकरता सर्वधर्मीय नागरीक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

<><><><>

१८व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून सुरुवात होत आहे. मुंबईत एनसीपीए इथं होणाऱ्या या महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्याला माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, तसंच मुंबई आंतरराष्ट्रीय महोत्सवाचे संचालक आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे संयुक्त सचिव पृथुल कुमार या कार्यक्रमाला संबोधित करणार आहेत. चित्रपटांमधून मनोरंजन होतं त्याचप्रमाणे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, असं डॉ. मुरुगन यांनी सांगितलं. बिली अँड मॉलीॲन ऑटर लव्ह स्टोरी या माहितीपटाच्या प्रदर्शनावेळी ते बोलत होते.

<><><><>

साहित्य अकादमीचे २०२४ या वर्षासाठीचे बाल साहित्य पुरस्कार आणि युवा पुरस्कार आज जाहीर झाले. मराठीत भारत सासणे यांच्या समशेर आणि भूत बंगला या कादंबरीला हा पुरस्कार जाहीर झाला आहे. युवा पुरस्कारात मराठीतल्या देविदास सौदागर लिखित उसवण या कादंबरीची निवड झाली आहे.

<><><><>

उन्हाळी सुट्टीनंतर आज पुन्हा एकदा राज्य शिक्षण मंडळाच्या शाळा मुलांच्या किलबिलाटाने भरून गेल्या. शाळेच्या पहिल्या दिवशी विविध शाळांमध्ये मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांचं स्वागत करण्यात आलं. रत्नागिरी मधल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुलांची प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर औक्षण करून, फुलं आणि लाडू देऊन

मुलांचं स्वागत करण्यात आलं. तर हिंगोली मध्ये विद्यार्थ्यांना पुस्तकांचं वाटप करण्यात आलं.

<><><><><>

मुंबई उपनगरात वडाळा इथं काल एका तीन मजली इमारतीची भिंत कोसळून झालेल्या अपघातात दोन महिलांचा मृत्यू झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीनं बचावकार्य सुरु केलं. या दुर्घटनेत जखमी झालेल्या या दोन महिलांना शीव इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं, मात्र तिथं त्यांना मृत घोषित करण्यात आलं.

<><><><><>

कुवेतमध्ये आगीत मृत्युमुखी पडलेल्या ४५ भारतीयांचं पार्थिव काल हवाईदलाच्या विशेष विमानानं भारतात आणण्यात आले. हे विमान कोचीमध्ये आणि नंतर नवी दिल्लीमध्ये उतरवण्यात आलं. मृतांमधे मुंबईतले डेनी करुणाकरन यांचा समावेश होता. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या भारतीयांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपयांचं अर्थसहाय्य देण्याची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे.

<><><><><>

आयसीसी टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि कॅनडा संघांमध्ये सामना होणार आहे. हा सामना फ्लोरिडा इथल्या सेंट्रल ब्रॉवर्ड पार्क मैदानावर भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता सुरू होईल.

//<><><><><>//